# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांची अनमोल शिकवण (खंड १)

# साधना प्रत्यक्ष शिकवण्याच्या पद्धती

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्र-स्थापनेचा उद्घोष करणारे

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले

**सहसंकलक**

पू. संदीप गजानन आळशी



**सनातन संस्था**


एप्रिल २०२३ पर्यंत सनातनच्या ३६१ ग्रंथांच्या मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तमिळ, तेलुगु, मल्ल्याळम्, बंगाली, ओडिया, आसामी, गुरुमुखी, सर्बियन, जर्मन, स्पॅनिश, फ्रेंच आणि नेपाळी या १७ भाषांत ९३ लाख ३९ सहस्र प्रती !

**प्रकाशक** : सनातन भारतीय संस्कृती संस्था
खोली क्र. १०३, सनातन आश्रम, सनातन संकुल,
पोस्ट – 'ओएन्जीसी', देवद, तालुका पनवेल,
जिल्हा रायगड (महाराष्ट्र) ४१० २२१.
दूरभाष क्रमांक : +९१ (०२१४३) २३३१२०

**अन्य दू.क्र.** : **गोवा** : +९१ (०८३२) २३१२६६४ **रत्नागिरी** : +९१ (०२३५२) २२९७७०
**सांगली** : +९१ (०२३३) २३२०३८३ **मुंबई** : +९१ ८६९३०८४५४५

**संगणकीय पत्र (ई-मेल)** : granth@sanatan.org

**मुखपृष्ठ संकल्पना** : सौ. अवनी संदीप आळशी आणि कु. सिद्धि महेंद्र क्षत्रिय

**ग्रंथ संरचनाकार** : सौ. संजना प्रदीप धाटकर आणि सौ. प्रार्थना प्रसाद देव

**आवृत्ती पहिली** : सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा 'ब्रह्मोत्सव (८१ वा जन्मोत्सव)', वैशाख कृष्ण ७, कलियुग वर्ष ५१२५ (११ मे २०२३)

**मुद्रणस्थळ** : राम सीता प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर


**अर्पणमूल्य** : ₹ १२०/– (₹ 120/-)

**ISBN** 978-93-94097-53-7 ॐ **ग्रंथ क्र.** : ३६२

© **प्रकाशक** All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, mechanical, photocopying, recording or otherwise, without the prior written permission of the original publisher. Violators will be liable for criminal / civil action.

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १०.५.२०२३ पर्यंत १२४ साधक संत झाले, तर १,०९१ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

५. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना दिशादर्शन !

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## सहसंकलक पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## प्रस्तुत ग्रंथाची अनुक्रमणिका

**(प्रकरणांतील वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


**प्रकरण १. सहज बोलण्यातून शिकवणे** १०

१ इ. गुण वाढवण्याच्या संदर्भात शिकवणे १४

१ ई. भावाच्या संदर्भात शिकवणे १७

१ ओ. परात्पर गुरु डॉक्टरांनी सहज बोलण्यातून साधकाच्या मनात हिंदु धर्म आणि धर्माचरण यांविषयी प्रेम निर्माण करणे २३

**प्रकरण २. अभ्यासवर्गांच्या माध्यमातून शिकवणे** २५

२ आ. परात्पर गुरु डॉक्टरांची अभ्यासवर्गात शिकवण्याची पद्धत २६

२ उ. परात्पर गुरु डॉक्टरांनी जिज्ञासूंना सूक्ष्मातील प्रयोग शिकवणे ३०

२ ऐ. अभ्यासवर्गांचे जिज्ञासूंना टप्प्याटप्प्याने जाणवलेले लाभ ३१

**प्रकरण ३. सत्संगांच्या माध्यमातून शिकवणे** ३२

३ ऊ. साधनेविषयी कृतीच्या स्तरावर मार्गदर्शन करणे ३५

३ ऐ. संस्थेच्या कार्याच्या संदर्भात वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे सांगून साधकांना अधिक क्रियाशील अन् व्यापक करणे ३८

३ ओ. साधनेचे चांगले प्रयत्न करणाऱ्यांना प्रोत्साहन देणे ४०

३ ग. परात्पर गुरु डॉ. आठवले सत्संगात मार्गदर्शन करतांनाचे सूक्ष्म ज्ञानाविषयीचे चित्र ४४

**प्रकरण ४. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून शिकवणे ४९**

४ उ. परात्पर गुरु डॉक्टरांनी साधकांना त्यांचा साधनामार्ग, कल किंवा प्रवृत्ती आणि क्षमता यांनुसार मार्गदर्शन करणे ५२

**प्रकरण ५. साधकांना अभ्यास करण्यास उद्युक्त करून त्याद्वारे शिकवणे ५६**

**प्रकरण ६. साधकांना त्यांच्या चुका दाखवून त्यातून शिकवणे ६३**

६ आ. परात्पर गुरु डॉक्टरांचा साधकांना चुका सांगण्यामागे ‘त्यांची साधनेत प्रगती व्हावी’, हा उद्देश असणे ६४

६ उ. परात्पर गुरु डॉक्टरांच्या साधकांना चुका सांगण्याच्या पद्धती ६५

६ ए. परात्पर गुरु डॉक्टरांनी साधकांना चुकांवर उपाययोजना म्हणून ‘स्वभावदोष अन् अहं निर्मूलनाची प्रक्रिया’ शिकवणे ८०

६ अं. परात्पर गुरु डॉक्टरांनी पूर्वीच्या संतांप्रमाणे साधकांची खडतर परीक्षा न घेता त्यांच्या केवळ साध्या चुकाच दाखवणे आणि त्यांतून शिकवणे ८८

६ ख. परात्पर गुरु डॉक्टरांनी एका कार्यक्रमाच्या वेळी साधकांना चुका सांगितल्यावर सूक्ष्मातून घडलेली प्रक्रिया ९०

**प्रकरण ७. पत्रलेखनातून शिकवणे ९२**

७ आ. परात्पर गुरु डॉक्टरांनी ह.भ.प. तुळशीदास पोखरकर महाराज यांना लिहिलेले कृतज्ञतापर पत्र ९७

**प्रकरण ८. सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टरांच्या बोलण्याचा साधकांना कळलेला सूचक अर्थ १०१**

**卐 सनातनच्या ज्ञानप्राप्तकर्त्या साधकाला सूक्ष्मातून मिळालेले ईश्वरी ज्ञान ! १०३**

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती १०५**

# ग्रंथमालिका : सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांची अनमोल शिकवण

## सामाईक मनोगत

'समर्थ रामदासस्वामींनी दासबोधात म्हटले आहे -

'धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वरी अवतार ।।'

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांनी सनातन संस्थेच्या स्थापनेपासून राष्ट्र आणि धर्म यांच्या उत्थानाचा महायत्न मांडला आहे. धर्मसंस्थापनेच्या कार्यात त्यांनी स्वतःला समर्पित केले आहे. ५.५.२०१८ या दिवशी नाडीपट्टीवाचनाच्या माध्यमातून महर्षि मयन यांनीही म्हटले आहे, 'सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले हे भगवान श्रीकृष्णाचेच अंशात्मक रूप असून ते धर्मसंस्थापनेच्या कार्यासाठीच भूतलावर अवतरले आहेत !' द्वापरयुगात श्रीकृष्णाची अमृतमय शिकवण गीतेच्या रूपात अवतरली. गीतेप्रमाणेच प्रासादिक, धर्मज्ञान देणारी आणि अखिल मानवांचा उद्धार करणारी अशी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांची शिकवण या कलियुगात प्रस्तुत ग्रंथमालिकेच्या रूपाने अवतरत आहे ! F (DrTe-Pra + SStSA-L + DrK-Av-Kr-Mah)

## सर्वांगस्पर्शी शिकवण !

आजपर्यंत भारतवर्षात सहस्रो संत-महात्मे होऊन गेले. बहुतेकांनी प्रामुख्याने कोणत्या तरी एका साधनामार्गाची शिकवण दिली आहे. कर्मयोग, भक्तीयोग आणि ज्ञानयोग या प्रचलित साधनामार्गांच्या जोडीलाच चित्रकला, मूर्तीकला, संगीत आदी कलांच्या माध्यमातून ईश्वरप्राप्तीची शिकवण देणारे, तसेच संस्कृतीपालन, समाजकारण, राष्ट्रकारण, धर्मजागृती, धर्मसंस्थापना म्हणजेच हिंदु राष्ट्राची स्थापना, सूक्ष्म-जगत् अशा सर्व अंगांच्या संदर्भात शिकवण देणारे सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले हे बहुधा या कलियुगातील एकमेवच असतील !

## साधनेविषयीची सुगम, प्रायोगिक अन् चैतन्यदायी शिकवण !

सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टरांची शिकवण कळायला सोपी, जीवनातील लहानसहान उदाहरणांतूनही अध्यात्म शिकवणारी आणि कृतीच्या स्तरावर साधनेविषयी मार्गदर्शन करणारी असल्याने सहज आचरणात आणता येते. उच्च कोटीतील संतांचे हे मार्गदर्शन असल्यामुळे ते चैतन्यदायी आहे अन् म्हणूनच अंतर्मनावर साधनेचा संस्कार दृढ करून कृतीला उद्युक्त करणारेही आहे.

## संतांची मांदियाळी निर्माण करणारी शिकवण !

सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टर आपल्या उक्तींतूनच नव्हे, तर कृतींतूनही साधकांना शिकवून सुंदर सुंदर साधक-रत्ने घडवतात. त्यांची शिकवण आचरणात आणल्यामुळे २०.४.२०२३ पर्यंत सनातनचे १२३ साधक संत बनले, तर १०८९ साधक संत बनण्याच्या मार्गावर आहेत !

## गुरूंच्या शिकवणीशी एकरूप व्हा !

गुरूंचे स्थूल रूप म्हणजे त्यांचा देह, तर सूक्ष्म रूप म्हणजे त्यांची शिकवण ! साधक गुरूंच्या स्थूल रूपाशी नव्हे, तर सूक्ष्म रूपाशी एकरूप होऊ शकतो. गुरूंच्या सूक्ष्म रूपाशी, म्हणजे शिकवणीशी एकरूप होता येण्यासाठी गुरूंनी दिलेली शिकवण सतत आचरणात आणणे महत्त्वाचे असते. सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टरांची शिकवण अभ्यासतांना ती भावाच्या स्तरावर अंतःकरणातही साठवा, म्हणजे आवश्यक त्या वेळी ती आठवून आचरणातही आणता येईल.

## प्रार्थना !

‘ज्ञानरूपी अमृताचे माधुर्य आणि साधनारूपी संजीवनीचे सामर्थ्य असलेली सच्चिदानंद परब्रह्म डॉक्टरांची शिकवण सर्वांनी आचरणात आणून शीघ्र आध्यात्मिक उन्नती करून घ्यावी’, ही श्री गुरुचरणी प्रार्थना !’

**– पू. संदीप आळशी (३.५.२०२३)** F (DrTe-Pra + SStSA-L)